॥ नववधू प्रिया मी बावरतें ॥

गायिकाः लता मंगेशकर
गीतः भा. रा. तांबे
संगीतः आरती प्रभू

नववधू प्रिया, मी बावरतें;
लाजतें, पुढे सरतें, फिरतें ॥ धृ. ॥

कळे मला तूं प्राण सखा जरि,
कळे तूंच आधार सुखा जरि,
तुजवांचुनि संसार फुका जरि,
मन जवळ यावया गांगरतें ॥ १ ॥

मला येथला लागला लळा,
सासरिं निघतां दाटतो गळा,
बागबगीचा, येथला मळा,
सोडितां कसें मन चरचरतें ॥ २ ॥

जीव मनींच्या मनीं तळमळे
वाटे, बंधन करुनि मोकळें,
पळत निघावें तुजजवळ पळें
परि काय करूं? उरिं भरभरतें ॥ ३ ॥

चित्र तुझें गेऊनि उरावरि
हारतुरे घालितें परोपरि,
छायेवरि संतोष खुळी करिं,
तूं बोलवितां परि थरथरतें ॥ ४ ॥